# दिनांक १३/०१/२०२५ रोजी झालेल्या खातेप्रमुख व गट विकास अधिकारी सभेचे इतिवृत्त

खातेप्रमुख व गट विकास अधिकारी यांची मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाबाबत सोमवार दिनांक १३/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. छ. शिवाजी महाराज सभागृहात आढावा सभा संपन्न झाली. सदर सभेत मा. श्री. मकरंद देशमुख, (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनी कामकाजाचा आढावा घेऊन खालीलप्रमाणे सूचना दिल्या.

| अ.क्र. | विषय | अपेक्षित कार्यवाही | पुर्तता करणारा विभाग |
|---|---|---|---|
| | | | |
| १. | | अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्रमांक:संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७/र.व-का.१ दिनांक १०/०१/२०२५ नुसार दिलेल्या ७ कलमी कार्यक्रमाचे सविस्तर वाचन करण्यात आले असून यामधील उपक्रम निहाय खालीलप्रमाणे माहिती देण्यात आली व आढावा घेण्यात आला. | खाते प्रमुख / गविअ (सर्व) |
| २. | संकेतस्थळ (Website) | वरील पत्रामधील दिलेल्या १ ते ६ मुद्यांनुसार कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच सर्व कार्यालयांनी संकेतस्थळ अद्यावत ठेवणेबाबत व सर्व माहिती अद्यावत करणेबाबत सूचना दिल्या. तसेच सर्व तालुक्यांनी कार्यालयाचे संकेतस्थळ Static न ठेवता Dynamic कसे ठेवता येईल यासाठी प्रयत्न करावेत अशा सूचना दिल्या. | खाते प्रमुख / गविअ (सर्व) |
| ३. | सुकर जीवनमान (Ease of Living) | वरील पत्रामधील दिलेल्या १ ते २ मुद्यांनुसार कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात आल्या. नागरीकांना सोप्या पदध्तीने सोयी सुविधा कशा प्रकारे देता येईल तसेच कागदपत्रांच्या होणाऱ्या हालचालीमध्ये होणारा विलंब कमी कसा करता येईल याबाबत काम करावे अशा सूचना दिल्या. | खाते प्रमुख / गविअ (सर्व) |
| ४. | स्वच्छता (Cleanliness ) | वरील पत्रामधील दिलेल्या १ ते ३ मुद्यांनुसार कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात आल्या. कार्यालयातील अभिलेख वर्गीकरण, जुन्या, निरुपयोगी साहीत्याचे निर्लेखन तसेच वाहनांचे निर्लेखन करणेबाबत सूचना दिल्या. | खाते प्रमुख / गविअ (सर्व) |
| ५. | जनतेच्या तक्रारींचे निवारण (Grievance Redressal) | वरील पत्रामधील दिलेल्या १ ते ३ मुद्यांनुसार कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात आल्या. यामध्ये नागरीकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींचे त्वरेने निराकरण करणे, नागरीकांना भेटीसाठी वेळ राखून ठेवणे तसेच लोकशाही दिनाची अंमलबजावणी करणेबाबत सूचना दिल्या. | खाते प्रमुख / गविअ (सर्व) |
| ६. | कार्यालयातील सोयी व सुविधा (Amenities at work Place) | वरील पत्रामधील दिलेल्या १ ते ५ मुद्यांनुसार कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात आल्या. यामध्ये दिलेल्या मुद्यांनुसार कर्मचारी वर्ग व अभ्यागत यांचे करीता दैनंदीन सोयीसुविधा जसे की, पिण्याचे पाणी, स्वच्छता गृह, प्रतिक्षालय इ. सोयी उपलब्ध करुन देणेबाबत सूचना दिल्या. | खाते प्रमुख / गविअ (सर्व) |
| ७. | गुंतवणूकीस प्रोत्साहन (Invesment promotion) | वरील पत्रामधील दिलेल्या १ ते ३ मुद्यांनुसार कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच तालुका / ग्राम पातळीवर येणाऱ्या गुतवणूकदारास/ नागरीकास योग्य ते सहकार्य करणेबाबत व आवश्यक ते दाखले/ NOCs देणेबाबत सूचना दिल्या. | खाते प्रमुख / गविअ (सर्व) |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | क्षेत्रीय भेटी (Field Visits) | वरील पत्रामधील दिलेल्या १ ते ४ मुद्यांनुसार कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात आल्या. केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्वाच्या कार्यक्रम/ प्रकल्पांना समक्ष भेटी देणेबाबत, कामकाजावर नियंत्रण ठेवणेबाबत तसेच ग्राम स्तरावरील अडचणी सोडवण्याबाबत सूचना दिल्या. | खाते प्रमुख / गविअ (सर्व) |
| ९. | ७ कलमी कार्यक्रमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे | महाराष्ट्र शासनाकडील वरील पत्रातील ७ कलमी कार्यक्रमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत मा. मु.का.अ. यांनी सक्त सूचना दिल्या. यामध्ये सर्व कार्यालयांनी नागरीकांच्या सोयीसुविधा, अभिलेख वर्गीकरण, जुन्या / निरुपयोगी साहित्याचे व वाहनांचे निर्लेखन, कार्यालयीन स्वच्छता, परिसराचे सौदर्यीकरण याबाबत प्रत्येक कार्यालयाने उद्दिष्ट निश्चित करुन दैनंदीन देखरेख व नियंत्रण ठेवून उद्दिष्ट पूर्ण करावीत व तसा अहवाल मा.मु.का.अ. यांना वेळोवळी सादर करावा अशा सूचना दिल्या. | खाते प्रमुख / गविअ (सर्व) |
| १०. | केंद्र व राज्य पुरस्कृत महत्वाच्या Flagship योजनांचा आढावा | मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या १०० दिवसांच्या कार्यक्रमामधील केंद्र व राज्य पुरस्कृत महत्वाच्या Flagship योजनांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये PMAYG, MSRLM, RGSA, माझी वसुंधरा ५.०, SBM, JJM, MREGS या योजनांचा तालुकानिहाय आढावा घेण्यात आला. तसेच सदर विभागांना १०० दिवसांसाठी दिलेले उद्दिष्ट पूर्ण करणेबाबत दैनंदीन देखरेख ठेवणेबाबत सूचना दिल्या. तसेच उर्वरीत सर्व विभागांनी त्यांना राज्यस्तरावरुन देण्यात आलेल्या सूचनांनुसार व सद्यस्थितीत त्यांच्या कार्यालयाकडे सुरु असलेल्या योजनांची उद्दिष्टपूर्ती १००% करणेबाबत सूचना दिल्या. | खाते प्रमुख / गविअ (सर्व) |

वरीलप्रमाणे सूचना दिल्यानंतर सभा संपल्याचे जाहीर करणेत आले.

Signed by
Makarand Pralhad Deshmukh
Date: 18-01-2025 11:19:58
(मकरंद देशमुख भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग**

जा.क्र.सिंजिप/साप्रवि/नियोजन/इतिवृत्त/२०२५
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग,
सिंधुदुर्गनगरी, दिनांक- १४/०१/२०२५.

प्रत:- माहितीसाठी
१) मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सिंधुदुर्ग यांना त्यांचे स्वीय सहाय्यकामार्फत.
२) अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सिंधुदुर्ग यांना त्यांचे स्वीय सहाय्यकामार्फत.
३) प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी
१) खातेप्रमुख (सर्व) जिल्हा परिषद सिंधुदुर्ग.
२) गट विकास अधिकारी, पचायत समिती (सर्व).
३) स.प्र.अ. / क.प्र.अ., सा.प्र.वि., जि.प. सिंधुदुर्ग.